पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
ई मेल dcphq.pcpc-mh@gov.in
दुरध्वनी क्र. ०२० - २७३५०१२०


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** दिनांक - ०१/०३/२०२३

## सर्व आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळून) चालू ठेवण्यास निर्बंध आदेश

(२०५-चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुक-२०२३)

२०५-चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया झाल्यानंतर सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये याकरीता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील चिंचवड, वाकड, सांगवी, हिंजवडी, देहूरोड व रावेत हद्दीतील हॉटेल, ढाबे, लॉजेस, दुकाने, पानटप-या व इतर सर्व आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळून) दिनांक ०२/०३/२०२३ रोजी रात्रौ २२/०० वा.पासून ते दिनांक ०३/०३/२०२३ रोजीचे सकाळी ०७/०० वा. पर्यंत या कालावधीत बंद ठेवणेबाबतचे आदेश पिंपरी चिंचवड पोलीसांकडून जारी करण्यात आलेले आहेत.

---